गुरुवार दि.१३ जून २०२४

किंमत २ रुपये । महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०१ अंक : २८५

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!

पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी

दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)

अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !

संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com    Lokneta News - लोकनेता न्युज    8459977904    www. lokneta.com


# अर्ध्या टक्क्याने आपला लोकसभेत पराभव झाला १५ ऑगस्टपर्यंत तिसरा खासदार होईल-अजित पवार

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

बघता बघता २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. मी देखील राष्ट्रवादीच्या त्या संपूर्ण प्रवासाचा साक्षीदार आहे. या पक्षाचे नेतृत्व अनेक लोकांनी केले. गेली २४ वर्ष आदरणीय पवार साहेबांनी या पक्षाचे नेतृत्व केले, त्याबद्दल मी त्यांची कृतज्ञता व्यक्त करतो, असे अजित पवार म्हणाले. तर नियतीच्या पुढे कुणाचं चालत नाही, काळवेळ कोणासाठी थांबत नाही, काळानुसार काही निर्णय घ्यावे लागत असतात, असेही ते म्हणाले. तर लोकसभेत केवळ अर्ध्या टक्क्याने आपला पराभव झाल्याची कबुली त्यांनी दिली.पक्षफुटीनंतर प्रथमच अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने षण्मुखानंद हॉलमध्ये वर्धापनदिन साजरा केला. या कार्यक्रमात अजित पवारांसह, छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, धनंजय मुंडे यांनी मार्गदर्शन केले.अजित पवार म्हणाले की, ज्यावेळी आम्ही एकत्र काँग्रेसमध्ये काम करत होतो. तेव्हा राम प्रधान राज्यसभेत पराभव स्वीकारावा लागला. आपण काँग्रेस पक्षात राहिलो तर कार्यकर्त्यांना आधार मिळणार नाही. कसे सहकारी मित्रांना विश्वास द्यायचा. त्यातून चर्चा सुरू झाली. पवार साहेबांनी संगमाजी यांना सोबत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली.पुढील काळात अनेकांसह विशेषत: भुजबळांनी तर मुलुख मैदानी तोफ म्हणून भुजबळ आक्रमपणे संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. पद्मसिंह पाटील असतील, तेव्हा आम्ही दुसऱ्या फळीतील कार्यकर्ते होतो. विविध नेत्यांनी या पक्षाला मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले. काळच्या नियतीपुढे कोणाचे चालत नाही. परंतु फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचा हा पक्ष पुढे चालवण्याचे काम आम्ही करत आहोत.अजित पवार म्हणाले की, काल वेगवेगळ्या प्रकारच्या बातम्या चालू होत्या. पण सकाळपासून दिल्लीत चर्चा केली. कारण नसताना कधीकधी मीडियातून गैरसमज पसरवल्या जातात. तरी देखील आपले सहकारी देवेंद्र फडणवीस यांनी वस्तूस्थिती सांगितली. पहिल्यांदाच एनडीए बैठक झाली. त्यावेळी आम्ही सर्वांशी चर्चा केली. १५ ऑगस्टपर्यंत राज्यसभेत तीन संख्या वाढणार आहे.आम्हाला जे नाव द्यायचे ते प्रफुल्ल पटेल यांचे नाव दिले आहे. जेव्हा इतर लोकांचे नाव सांगितली. जर तुम्हाला करता येत नसेल तर आम्ही एनडीएसोबत आहोत. पण आम्हाला ते स्वीकारायचे नाही. सर्व निर्णय एकत्र करून घेतले गेले. त्यामुळे कार्यकर्त्यांनी चुकीचा प्रचार ऐकू नये, असे आवाहन देखील अजित पवार यांनी केले. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत अपेक्षित असे यश मिळाले



नाही. रायगड मतदारसंघात आपल्या पक्षाला विजय मिळाले ही अभिमानाची गोष्ट आहे. रायगडमधून विजय झाल्याने आपल्या पक्षाची लाज राखली. सगळ्यांनी वेळ दिला पाहिजे, अर्थसंकल्प सादर केल्यानंतर मी चार दिवस पक्षाच्या कामासाठी देईल, कार्याध्यक्षांनी व सेलच्या पदाधिकऱ्यांनी ठरावीक लोक बसले पाहिजे, काय दौरा होता. सर्वांचा दौरा काय केले.अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, त्या पद्धतीने आपल्या सर्वांची जबाबदारी आहेत. लोकसभेच्या पार्श्वभूमीवर ज्या गोष्टी राहिल्या त्या काळजीपूर्वक करायचे आहे. समविचार लोक एकत्र बसायचे. पण स्थानिक लेवलवर काम करणारा कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचले गेले नाही. कार्यकर्त्यांची मन जुळली गेली नाही. ती जे काही अंतर पडले होते. ती दुरूस्त करण्याची संधी मिळाली नाही.

अजित पवार म्हणाले की, आम्ही महायुतीमध्ये आहोत. पण आम्ही फुले शाहू आंबेडकर यांचे विचार कधीच सोडणार नाही. परंतु विरोधकांनी चुकीचा नरेटिव्ह मांडला गेला. तो नरेटिव्ह मोडण्यात आपण कमी पडलो. यामध्ये आदिवासी, मागासवर्गीय समाज बाजूला गेला. काही करून मत कशी मिळवायची आहे. सीएए बद्दल मुस्लिम समाजाबद्दल सांगितले गेले.अजित पवार म्हणाले की, अर्ध्या टक्क्याच्या फरकाने आज लोकसभेतील निकालाचे चित्र बदलले. आम्ही देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे व आम्ही सर्व लोक एकत्र बसलो. पराभव आम्ही स्वीकारला पण आम्ही गांभीर्याने घेतले आहे. आमची तयारी अतिशय व्यवस्थित सुरू केलेली आहे. सोशल मीडियाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.अजित पवार म्हणाले की, कांदा या पिकाने तर सर्वांना रडवलं. रावेर, जळगाव सोडले तर उत्तर महाराष्ट्रातील सर्व जागा हारलो. त्यामुळे आता या गोष्टीचा विचार केला गेला पाहिजे. आचारसंहितेच्या काळात देखील अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. सद्या पडत असलेल्या पावसाचा देखील आढावा घेतला. लोकांप्रती व शेतकऱ्यांप्रती आम्ही कायम बांधिल आहोत, असेही अजित पवार म्हणाले.

# भोकरदन येथे खासगी नेत्रालयात महिलेचा मृत्यू ; बालाजी नेत्रालयाचा डॉक्टर फरार

लोकनेता न्यूज नेटवर्क

भोकरदन । शेख जफर






बालाजी नेत्रल्याच्या समोर जमा झालेले नातेवाईक

शहरातील एका खासगी नेत्र रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी आलेली महिला रुग्ण इरफानाबी रफिक शेख (वय ५२, रा. जोमाळा, ता. भोकरदन) यांचा ऑपरेशन थेटरमध्ये मृत्यू झाल्याची घटना(दि.११).मंगळवार रोजी सकाळी ११ वा.दरम्यान घडली.या घटनेमुळे भोकरदन शहरात एकच खळबळ उडाली असून सदरील खासगी बालाजी नेत्रालयाचा डॉक्टर फरार झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की,मृत महिलेच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या दोन दिवसांपूर्वी इरफानाबी रफिक शेख या खासगी रुग्णालयात डोळे तपासणीसाठी आली होती.तेव्हा डॉक्टरांनी तपासून त्यांना ऑपरेशनसाठी मंगळवारी बोलावले होते.सकाळी अकरा वाजेदरम्यान नंबर लागल्यानंतर ती महिला डोळ्याच्या ऑपरेशनसाठी दवाखान्यात आली.तिथे डॉक्टरांनी ऑपरेशन सुरू करण्यापूर्वी डोळ्यांमध्ये एक इंजेक्शन दिले.त्यानंतर इरफानाबी शेख यांची प्रकृती बिघडली.नातेवाईकांना थोडा संशय आल्याने त्यांनी डॉक्टरांकडे चौकशी केली.ऑपरेशन थेटरमध्ये पाहिले असता सदरील महिला जमिनीवर पडल्याचे दिसून आले. नातेवाईकांनी तत्काळ इरफानाबी शेख यांना तिथून भोकरदनच्या एका दुसऱ्या खासगी रुग्णालयात नेले.मात्र तेथे डॉक्टरांनी तिला तत्काळ सिल्लोड येथे घेऊन जाण्याचे सांगितले. नातेवाईकांनी त्यांना सिल्लोड येथेही एका खासगी रुग्णालयात हलविण्यात आले मात्र,तेथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.तिथून त्यांनी भोकरदन ला बालाजी नेत्रलायात आणून नातेवाईकांनी नेत्रलायाच्या डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचे सांगून नेत्रलायच्या डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.नंतर पोलिसांनी पंचनामा करून सीसीटिव्ही फुटेज चौकशीसाठी ताब्यात घेतले.मात्र,नातेवाईकांनी इनकॅमेरा शेवइच्छेदन करण्याची मागणी केल्याने छत्रपती संभाजीनगर औरंगाबाद शासकीय रुग्णालयात इनकॅमेरा शेवइच्छेदन करून डॉक्टरांनी मृत्यूदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिले.नंतर जोमाळा येथे जनाजा नमाज पठण करून जवळील कब्रस्थान मध्ये दफनविधी करण्यात आली.त्यांच्या पश्चात पती, चार मुले,दोन मुली,सून असा परिवार आहे. याप्रकरणी भोकरदन पोलिस ठाण्यामध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद घेण्यात आली आहे.तपास पोलिस - उपनिरीक्षक पवन राजपूत हे करीत आहेत.

# नीट परिक्षेच्या गैरप्रकाराची चौकशी करण्याची जिजाऊ ब्रिगेडची मागणी



लोकनेता न्यूज नेटवर्क

अनिलकुमार गोठी । मलकापूर

वैद्यकिय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या नीट परिक्षेमध्ये गैरप्रकार झाल्याची बातमी विविध प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमे यामधुन वाचण्यात आली. या गैरप्रकारांची चौकशी व्हावी व वैद्यकीय ॲडमिशन प्रक्रिया थांबवावी यासाठी शेकडो विद्यार्थ्यांसह जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा अध्यक्ष सौ कोमल सचिन तायडे,राष्ट्रवादी विध्यार्थी जिल्हाध्यक्ष शुभम लाहुडकर, प्रा पाटील यांनी यांनी मलकापूर उपविभागीय अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.याबाबत असे की,यावर्षी लागलेल्या निकालात काही अनपेक्षीत बाबी लक्षात आलेल्या असुन परिक्षेमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप पालगवर्ग करत आहे. तसेच परिक्षेपुर्वीच पेपर लीक झाल्याचे सुध्दा बातम्या प्रसारीत झाल्या आहेत.परिक्षेचे स्वरुप अत्यंत कठीण असुनसुध्दा यावर्षी खुप (६७) विद्यार्थींना ७२० पैकी ७२० गुण मिळाल्याचे निदर्शनास आलेले आहेत व हरियानामधील एकाच केंद्रावर ८ विद्यार्थींना पैकी च्या पैकी गुण मिळालेले आहे. अनेकांच्या मते हे शक्य नसल्याचे बोलल्या जात आहे.तरी पालक व विद्यार्थींचा रोष लक्षात घेता यावर्षीच्या छएएढ परिक्षेची उइख मार्फत चौकशी होऊन कोणी दोषी असल्यास कठोर कार्यवाही करावी यासाठी हे निवेदन सरकारकडे उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत संबंधीतांना वर्ग करण्याची विनंती निवेदन कर्त्यांकडून करण्यात आली आहे.तरी प्रशासनाने चौकशी करुन दखल न घेतल्यास विद्यार्थ्यांच्या समवेत पुर्वकल्पना देऊन आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी सौ कोमल तायडे व शुभम लाहुडकर यांच्याकडून देण्यात आले आहे.

# आजही राज्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट

लोकनेता न्यूज नेटवर्क

पुणे(वृत्तसंस्था)

राज्यात यंदा पावसाची चांगली सुरूवात झाली आहे. सगळीकडे वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळताना दिसत आहे. कोकण, सिंधुदुर्ग, रायगड, मध्य महाराष्ट्रामध्ये अहमदनगर, नाशिक, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, बीड, जालना आणि विदर्भ बुलढाणा जिल्ह्यांमध्ये देखील जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. मान्सूनने निम्मा महाराष्ट्र व्यापला असून आजही अनेक जिल्ह्यांत पावसाचा इशारा देण्यात आला आहे.तसेच येत्या ४८ तासांत अनेक भागात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. आज कोकण आणि उत्तर महाराष्ट्र तसेच मराठवाड्याला पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

## चारोळी

रिमझिम पावसात भिजून
धरा मनोमन हर्षुन गेली
अंगाखांद्यावर खेळणारी लेकरं
पान्हा पिऊन तृप्त झाली.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# शासनाच्या रेती धोरणाचे गोड बंगाल जिंतूर तालुक्यातील अनेक ठिकाणी ठिकाणाहून अवैध रेती वाहतूक

## रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष शरद चव्हाण यांचे धरणे आंदोलन

लोकनेता न्यूज नेटवर्क

जिंतूर । पंकज चव्हाण



जिंतूर. तालुक्यातील गरजू घरकुल धारकांना स्वस्त दरात रेती उपलब्ध व्हावी रेती तस्कराकडून त्यांची आर्थिक अडव णूक होऊ नये असे शासनाचे धोरण आहे पण एकही रेती डेपो सुरूच केला नाही आणि रेती घाट तस्करासाठी खुले ठेवण्या मागे शासनाचे धोरण काय आहे असा सवाल विचारला जात आहे सहाशे रुपये ब्रास प्रमाणे रेती विक्री करण्याची शासनाचे धोरण हवेतच विरघळली आहेत शासनाच्या रेती धोरणाची गोड बंगाल रेती तस्करांच्या फायद्याचे झाले आहेत दरम्यान प्रशासनाच्या अटी व शर्ती यांची कुठली पूर्तता केली जात नसताना त्यांनी रेती घाट घाटातून उत्खनना वाहतुकीची परवानगी प्रशासनाने का दिली प्रशासनाला या माध्यमातून काही आर्थिक लाभ आहे का या रेती घाटावर प्रशासकीय मान्यता मिळाली नाही त्या घाटावर जाऊन ते निरीक्षण का करीत नाही असा प्रश्न ही उपस्थित केला जात आहे काही वर्षांपासून गोंन उत्खननात वाढ झाली आहे या विरोधात राज्य सरकारने पुढाकार घेत वाळू दगड मुरूम गोन खनिज उत्खनन करणाऱ्या गाडीवर कारवाई करावी या मागणीसाठी दिनांक १० जून सोमवार रोजी पासून शरद चव्हाण बेमुदत धरणे आंदोलन करत आहेत जिंतूर तालुक्यातील अनेक खडे मशीन चालू आहेत त्यांनी गेल्या आर्थिक वर्षात किती महसूल जमा केला यांची माहिती तहसील प्रशासनाकडे नाही येथील खनिज दगड माती यांचे मोठ्या प्रमाणात उत्खनन होत आहे महसूल प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करीत आहे त्यामुळे शासनाच्या महसूल मोठ्या प्रमाणात मिळत आहे.

# सहा वर्षापासून अनुकंप तत्वावर नोकरीस घेत नाहीत सुनिता गित्ते यांच्या कुटुंबाचे दुसऱ्या दिवशी आमरण उपोषण सुरू

## उपोषणकर्त्या सुनिता गित्ते यांना गंभीर आजार असून प्रकृती खालावली तरी देखील समाज कल्याण प्रशासनाचे दुर्लक्ष

लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे




साने गुरुजी निवासी विद्यालय केज ता. जिल्हा बीड येथे कै. गोविंद ज्ञानोबा गीते ते सहशिक्षक पदावर कार्यरत होते, त्यांच्या निधनानंतर अनुकंपातत्वावर त्यांचा मुलगा श्रीनाथ गोविंद गीते यास नियमानुसार नोकरी मिळावी म्हणून सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन व वारंवार 'पाठपुरावा करुनही आजतागायत नौकरी मिळत नसल्याने व मोठ्या आजाराने मुळे गित्ते कुंटूबावर उपासमारीची वेळ आली आहे. सुनिता गोविंद गीते व कुंटूबावर होत. होत असलेला अन्याय दुर व्हावा म्हणून वारंवार समाज कल्याण कार्यालयास व वरिष्ट कार्यालयास पत्र व्यवहार केला आहे. परंतु पत्रव्यवहाराची कोणतीही दखल न घेता सतत प्रस्तावात त्रुटी काढून नौकरी दिली जात नाही. मात्र इतरांच्या नियुक्त त्यांनी पैसे घेऊन केले आहे. व गीते कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे. त्यामुळे मी दिनांक २७/०५/२०२४ रोजी उपोषण करण्याची नोटीस दिली होती. तरी अद्यापपर्यंत बीड अनुकंप तत्वावरील नौकरीची ऑर्डर दिली नाही. त्यामुळे नाईलाजास्तव होत असलेल्या अन्याया विरुध्द दिनांक १०/०६/२०२४ रोजी पासुन समाज कल्याण कार्यालयासमोर सहकुंटूब आमरण उपोषणास बसले आहे. गीते कुटुंबीय उपोषणा करण्यापासून बीड समाज कल्याण विभागातील अधिकारी कर्मचारी दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून नियमबाह्य भरलेल्या जागेची तपासणी करण्यात यावी यामध्ये मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचेही उपोषणकर्त्यांचा आरोप आहे. उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे व अद्यापही समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी या उपोषणकर्त्यांची दखल घेतली नाही. उपोषणकर्ते या गंभीर आजारात असल्यामुळे त्यांच्या जीवाचं काय बर वाईट झालं तर याची परिणाम समाज कल्याण विभागातील अधिकाऱ्यांना भोगावे लागतील कुपोषणाचा आज दुसरा दिवस सुरू आहे.

संपादकीय

# तिसऱ्या खेपेतील पहिली खेळी



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: शपथ घेतानाच ७१ सहकारी मंत्र्यांचाही शपथविधी करून नवे सरकार कामाला लागल्याचा संदेश दिला आहे. अनेक मित्रपक्ष सोबत असल्याने हे मंत्रिमंडळ 'जंबो' होणे स्वाभाविकच होते. मात्र, निकाल लागल्यानंतर, भारतीय जनता पक्षाला मोठा फटका बसल्याचे जे चित्र उभे राहिले होते; त्याचे प्रतिबिंब मंत्रिमंडळाच्या रचनेत दिसत नाही. मित्रपक्षांना ११ मंत्रिपदे मिळाली असली तरी त्यासाठी भाजप नेतृत्वावर दबाव आणण्यात यश आलेले नाही. तसे नसते तर शिवसेना शिंदे गटाला स्वतंत्र कार्यभाराचे एकच राज्यमंत्रिपद आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाची तर उपासमारच; असे चित्र दिसले नसते. मोदींनी नारायण राणे, भागवत कराड यांना वगळले असले तरी महाराष्ट्राला सहा मंत्रिपदे दिली आहेत. काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेले रवनीत सिंग हे लुधियानात पराभूत झाले, तरीही त्यांना मंत्रिपद मिळाले. हा अपवाद वगळता पराभूतांना स्थान मिळालेले नाही. त्यामुळेच, स्मृती इराणी, रावसाहेब दानवे आदींचा मंत्री होण्याचा प्रश्न नव्हता. पुण्यातून लोकसभेवर निवडून गेलेल्या खासदाराला सुरेश कलमाडी यांच्यानंतर प्रथमच मंत्रिपद मिळाले आहे. मुरलीधर मोहोळ यांना केवळ पुण्यासाठी नव्हे, तर पश्चिम महाराष्ट्रासाठी मंत्रिपद मिळाले आहे. खासदार झाल्या झाल्या मंत्रिपद मिळणे, ही मोठी संधी आहे. ती त्यांना कल्पकतेने वापरावी लागेल.

पंतप्रधानांनी मंत्रिमंडळाची रचना करताना धक्कातंत्र अवलंबलेले नाही. सगळे ज्येष्ठ मंत्री पुन्हा परतले आहेत. त्यांची खातीही तीच आहेत. भाजपचे अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा आरोग्यमंत्री झाल्याने पक्षाची धुरा कोणाकडे जाणार, याचे औत्सुक्य आहे. महाराष्ट्र, हरयाणा, झारखंड यांच्या विधानसभा निवडणुका दूर नाहीत. पुढच्या वर्षी लगेच बिहारच्याही निवडणुका आहेत. महाराष्ट्राच्या निवडणुका तोंडावर असूनही मित्रपक्षांच्या पदरात फारसे काही पडलेले नाही. याउलट, बिहारमध्ये मित्रपक्षांवर लयलूट झाली आहे. 'हम' पक्षाचे जीतनराम मांझी एकटेच खासदार आहेत, पण ते कॅबिनेट मंत्री झाले. चिराग पासवानही मंत्री झाले. भाजपला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने हे मंत्रिमंडळ अधिक समावेशक, सर्व प्रकारच्या चेहऱ्यांचे आणि अधिक अनुभवसंपन्न झाले आहे. यात एकही मुस्लिम मंत्री नाही. मात्र, जॉर्ज कुरियन हे केरळमधील भाजप नेते मंत्री झाले. याशिवाय, मोदी यांच्यासहित मंत्रिमंडळात तब्बल सात माजी मुख्यमंत्री आहेत. या सर्वांच्या अनुभवाचा उपयोग झाला तर अधिक चांगले काम होईल. तसेच, नव्या सरकारवरचा 'पीएमओ'चा प्रभाव काहीसा कमी होऊ शकेल. अटलबिहारी वाजपेयी यांची दोन मंत्रिमंडळे सुरळीत चालली; याचे एक कारण पंतप्रधानांनी आपल्या व मित्रपक्षांच्या मंत्र्यांना दिलेले कामाचे स्वातंत्र्य हे होते. सध्या नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू हे आपापल्या राज्यांना आर्थिक खाईतून बाहेर काढण्यासाठी 'स्पेशल पॅकेज' किंवा विशेष दर्जा मिळवण्याच्या खटपटीत आहेत. त्यामुळे, ते मोदी सरकार अस्थिर करण्याची शक्यता बरीच कमी आहे. निकालांच्या धक्क्यातून सावरलेल्या भाजपमध्ये शपथविधीच्या समारंभात जो उत्साह दिसत होता; त्यामागे सरकारच्या स्थैर्याची हमी हेही एक कारण होते. मंत्रिमंडळाच्या रचनेतही पंतप्रधानांना वाटणाऱ्या या आत्मविश्वासाचे प्रतिबिंब पडले आहे.

सोमवारी संध्याकाळी जे खातेवाटप समोर आले; त्यातही धक्कादायक असे काही नव्हते. प्रमुख मंत्री आणि त्यांची खाती यांना मित्रपक्षांमुळे धक्का बसलेला नाही. वाजपेयींच्या मंत्रिमंडळात मित्रपक्षाचे जॉर्ज फर्नांडिस हे संरक्षणमंत्री होते. भाजपचे संख्याबळ पाहता तितके परावलंबन आवश्यक नव्हतेच; शिवाय, यात मोदी यांच्या सलग तिसऱ्या विजयाचाही वाटा आहे. मंत्र्यांच्या अनौपचारिक बैठकीत मोदींनी 'कामाला लागा' असे म्हटले होते. त्यांनी स्वत: पहिल्या निर्णयात नऊ कोटी ३० लाख शेतकऱ्यांना किसान सन्मान योजनेचे २० हजार कोटी रुपये वितरीत केले. हा हप्ता एका महिन्यापूर्वीच लागू होता, असे काँग्रेसने म्हटले असले तरी आचारसंहिता संपल्यावर नवे सरकार येताक्षणी हा निर्णय होण्याला महत्त्व होते. मोदी यांनी पहिल्या शंभर दिवसांत करावयाच्या कामांची जी यादी केली आहे; ते निर्णय कधी व कसे होणार, याकडे आता सगळ्यांचे लक्ष असेल. यावेळी, लोकसभेतील विरोधकांची ताकद जशी वाढली आहे; तसेच सरकारही केवळ एका पक्षाचे नाही. मित्रांच्या आग्रहामुळे 'अग्निवीर' योजनेचे पुनरावलोकन होते का, मागे घेतलेल्या कृषी विधेयकांचे काय होणार, याचेही औत्सुक्य आहे. शिवराजसिंह चौहान यांच्यासारखे सौम्य स्वभावाचे संवादी नेते कृषिमंत्री झाल्याने हा विधेयकांचा तिढा सुटतो का, हे पाहावे लागेल. देश सध्या महागाईने होरपळतो आहे; तसेच, रोजगार निर्मितीच्या आघाडीवर सरकारला लक्ष्य गाठता आलेले नाही. बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. हे लक्षात ठेवून मोदी सरकारला चमकदार घोषणांच्या पलीकडे जाऊन काम करावे लागेल.

# आ.धस यांच्या वेळोवेळीच्या पाठपुराव्याला अखेर यश

## अखेर आष्टी नगरपंचायत शहर विकास आराखडा मंजूर–नगराध्यक्ष जिया बेग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**





आष्टी शहराचा २०१५ पासून प्रलंबित असलेला शहर विकास आराखडा अखेर आ.सुरेश धस यांच्या शासन दरबारी वेळोवेळीच्या पाठपुराव्याने मंजूर झाला आता शहराचे रुपडे बदलणार असून हा शहर विकास आराखडा मंजूर झाल्याने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस व आमदार सुरेश धस यांचे नगराध्यक्ष जिया बेग यांनी जाहीर आभार मानले आहेत.

आष्टी नगरपंचायत कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

पुढे बोलताना नगराध्यक्ष जिया बेग म्हणाले,आष्टी नगरपंचायत २०१५ साली नगरपंचायत अस्तित्वात आल्यानंतर आ.सुरेश धस यांच्या ताब्यात असलेली नगरपंचायतचा कायापालट झाला आहे.अखेर २०१५ पासून शहराचा विकास आराखडा हा प्रलंबित होता.या आराखड्याबाबत आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली तत्कालीन प्रथम नगराध्यक्ष नवाब खान यांनी या आराखड्याचे सर्वेक्षण केले होते ते आत्ता अखेर नऊ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर अत्यंत जिव्हाळ्याचा आणि अत्यावश्यक असलेला प्रलंबित प्रश्न विद्यमान नगराध्यक्ष जिया बेग यांच्या कार्यकाळात मंजूर झाला आहे. मागील महाविकास आघाडीच्या काळात या शहर विकास आराखडा मंजूर करण्यासाठी अनेक अडथळे आले होते.मात्र, आत्ता महायुती सरकारच्या काळात सरकारकडे सततच्या पाठपुराव्याने आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने हा शहराचा आराखडा मंजूर करून घेण्यात आला आहे. या आराखड्यामध्ये येणाऱ्या पुढील ३५ वर्षाच्या अनुषंगाने करण्यात येणारे विकास कामे व शहर विकासाला चालना मिळून प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार आहेत.यामध्ये बेघर कुटुंबांसाठी जागा आरक्षित करण्यात आली असून बेघरांना आता घरकुल मिळणार आहेत.तर बेरोजगार युवकांना शहरात ठिकठिकाणी कॉम्प्लेक्स होणार आहेत. यामध्ये शहरातील अनेक रस्ते पूर्ण तर काही रस्ते अपूर्ण राहिले आहेत त्यामध्ये अण्णाभाऊ साठे ते शनी मंदिर १५ मि.पूर्ण, शनी मंदिर ते कमान वेस १२ मि.पूर्ण, कमानवेश ते तलवार नदी ९ मि. पूर्ण,शनी मंदिर ते शेकापुर रस्ता १२ मि.अपूर्ण, आनंद ऋषी चौक ते संभाजी चौक १२ मि.पूर्ण, संभाजी चौक ते भाजी मार्केट ९ मि. पूर्ण, भाजी मार्केट ते मेहेर गल्ली ९ मि. पूर्ण,श्री भोज यांचे घर ते शेकापूर रोड ९ मि. पूर्ण, कमानवेस ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड १२ मि.पूर्ण, कमानवेस ते संभाजी चौक ९ मि. पूर्ण,पठाडे कॉम्प्लेक्स ते अनिल भैय्या निकाळजे चौक ९ मि. पूर्ण, द्वारके यांचे घर ते नगर बीड रोड १२ मि.अपूर्ण, सानप हॉस्पिटल ते बाजारतळ १२ मि.अपूर्ण, टिपू सुलतान चौक ते बुद्धविहार ९ मि.पूर्ण,याच बरोबर शहरात विविध ठिकाणी शॉपिंग कॉम्प्लेक्स ला मंजुरी मिळाली आहे.या शहर विकास आराखडाला मंजुरी दिल्याने राज्याचे मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,आ.सुरेश धस यांचे विशेष आभार नगराध्यक्ष जिया बेग यांनी मानले आहेत.

# ज्ञानराधाच्या ठेवीदारांचा पैशाचा मार्ग मोकळा

## आय.सी.आय.सी.आय बँकेकडे आला अधिकृत मेल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**




ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या ठेवीदारांसाठी पैशाचा मार्ग मोकळा झाला असून आयसीआयसीआय आणि मिणवेंटा रिसर्च यांच्यामध्ये कम्युनिकेशन झाल्याचा मेल मध्यरात्री प्राप्त झाला आहे यामुळे येत्या दोन दिवसात ठेवीदारांना पैसे मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे अशी माहिती विश्वसनीय सूत्राकडून मिळाली आहे.

गेल्या काही दिवसापासून आपण पाहत आहोत कुटे ग्रुपची नामवंत असणारी ज्ञानराधा मल्टीस्टेट जिच्या ५२ शाखाच अशी फार मोठे विस्तारीत जाळ असणाऱ्या व्यापक स्वरूप लाखो ठेवीदारांची विश्वासास पात्र असणारी गेल्या नऊ महिन्यापासून अनेक वेगवेगळ्या चर्चेचा स्वरूपात अविश्वास दाखवण्याचा प्रयत्न होत आहे परंतु कुठल्याही दबावाला बळी न पडता स्वतः पॉझिटिव्ह राहून या संस्थेचे चेअरमन सुरेश कुटे यांनी ठेविदारांचा एक ना एक रुपया देण्याचा जो मनात ध्यास करून त्याच्यावर काम करत असताना आज ते स्वतः जेलमध्ये असून सुद्धा त्यांच्या लीगल टीमला काम करण्याचा प्रोत्साहन देऊन आज ते काम पूर्णत्वाकडे नेण्यासाठी जो प्रयत्न करता येईल तो यशस्वीर रित्या पार पाडत असताना आज काही महिने महिन्याचे दिवसावर व आता काही तासावर जे काम आले आहे ते काम लवकरच काही मिनिटात आपल्या खात्यावर पाडण्याची प्रोसिजर सुरू झाली आहे त्यात कुठली शंका नसून काही काळातच प्रत्येक ठेवीदाराच्या अकाउंटला पैसे पाडण्यासाठी जोरदार प्रयत्न कुटे ग्रुप कडून होत आहे अशी विश्वसनीय सूत्रांनी आज आपल्याला माहिती दिली आहे.मात्र यातून मार्ग काढत ठेवीदारांसाठी पैशाची व्यवस्था केली असून गेल्या दोन दिवसांपासून यामध्ये मोठ्या प्रमाणावर हालचाली सुरू होत्या बुधवारी सायंकाळी संबंधित बँकेडून आयसीआयसीआय बँकेकडे मेल प्राप्त झाला असून तांत्रिक अडचणी दूर करून येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये ठेवीदारांच्या खात्यावर थेट पैसे देण्याची प्रक्रिया ज्ञानराधाच्या वतीने सुरू करण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाले आहेत. ठेवीदारांनी काही दिवसांसाठी संयम ठेवून ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या प्रशासनाला सहकार्य केल्यास ठेवीदारांचे पैसे मिळण्याचा मार्ग मोकळ्या होण्याची शक्यता आहे असेही यावेळी सांगण्यात आले.

### सुरेश कुटे ठेवीदारांच्या विश्वासाला जागृत

**कुठले ही संकट आल्यानंतर त्या संकटात स्वतःला सावरून व जिद्द व चिकाटी या जोरावर संकटावर मात करण्यासाठी फार मोठी हिम्मत लागते आणि ती हिम्मत सुरेश कुटे यांनी सिद्ध करून दाखवली आहे कुठलेही पळपूटेपणा न करता आणि चर्चेला उद्यान आले होते की हे देश सोडून वीदेशात जाणार आहे त्याच वेळेस यांनी आपले पासपोर्ट पोलीस प्रशासनाकडे सुपूर्द केले व कुठल्याही प्रकारे कुठेही पळून न जाता गुन्हे दाखल झाल्यानंतर सुद्धा आपल्याच कामावर लक्ष केंद्रित केले स्वत: ज्यावेळेस यांना लोकेशन द्वारे पोलिसांनी ताब्यात घेतले त्याचप्रमाणे आज ते पोलिसांना सलेंडर होऊन आज जेलमध्ये असताना सुद्धा पोलीस प्रशासनास सहकार्य करून आपल्या कामावर फोकस करून ते ठेविधारांचा एक ना एक रुपया देण्यासाठी प्रयत्न करत आहेत नक्कीच त्यांना ठेवीदारांच्याच विश्वासाला जागृत असल्याचे दिसते.**

# निसर्गाने मोफत दिलेलं नष्ट करू नका, त्यात भर घालून ते वाढवा

लोकनेता न्यूज नेटवर्क

माझ्या आजोबांनी लावलेल्या आंब्याच्या झाडाचे आंबे आज ही आम्ही गावी गेलो की हक्काने खातो.त्यांनी ते आंब्याचे झाड मुलासारखे वाढविले.त्यावर हक्क अधिकार आज आजोबांची मुल नातु दाखवतात.पण आजोबा नंतर बापाने लावलेले एक ही झाड नाही.आम्ही गावातून घरातुन विद्यार्थी म्हणून शिक्षणासाठी बाहेर गेलो. शिक्षणपूर्ण झाल्यावर नंतर नोकरी मिळाली. त्यामुळे गाव वावर यांच्याशी जुळणार नातं कमी कमी होत गेले.पाणी वाचवा,पाणी अडवा,पाणी जिरवा ह्या म्हणी ग्रामीण भागात सार्वजनिक जागी भिंतीवर लिहलेल दिसते.गावातील लोक त्याचे पालन ही करतात. झाडे लावतात आणि त्यांची फळे ही खातात.

मुंबई सारख्या शहरात पाणी आडवा पाणी जिरवा हा प्रकार नसतो. तर योजना आडवा निधी जिरवा असा प्रकार चालतो. उन्हाळ्यात म्हणजे एप्रिल,मे मध्ये उन्हाणे माणसांना प्रचंड उकाळा उष्णता सहन होत रोड वर उभे राहण्यासाठी कुठे ही झाड नाही. उष्णता आणि पिण्याचे पाणी कपात ही शहरतील लोकांची दरवर्षी मोठी समस्या असते.घरात कार्यालयात आणि गाडीत सुद्धा एसी असल्या शिवाय मानस जगू शकत नाही.त्यांना ऑक्सीजण मोफत मिळत नाही. तेव्हा त्यांना झाडाचे महत्व आठवते. शाळा,कॉलेज मध्ये शिकवलेले झाडाचे महत्व आता कुठे कळते. पण वळत नाही.

मुंबईतील निसर्ग निर्मित डोंगर व डोंगरातील झाडे बिल्डरनी नष्ट केले.त्यामुळे सर्वच ठिकाणी सिमेंट कॉनक्रेटचे जंगल निर्माण झाले आहे.

निसर्ग सांगतो डोंगर आणि झाडाशिवाय जमीनीत पुरेसे पाणी साठवणे अशक्य आहे. डोंगर हे जमिनीतील पाणीसाठ्याचे बाह्य कवच असते. उन्हाळ्यात डोंगराचे बाह्य आवरण तापते.माञ भूपृष्ठापर्यंत उष्णता पोहचू न शकल्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन होत नाही.या उलट डोंगर फोडला तर उष्णता थेट पोहचते व डोंगराच्या पोटातील ओलावा संपुष्टात येतो.पाणी जमिनीत दोन प्रकारे साठले जाते. एक मृत साठ्याचे पाणी.दुसरे जिवंत साठ्याचे पाणी.मृत साठ्याचे पाणी हे दहा फुटावर पाझरते तर जिवंत साठ्याचे पाणी दहा ते १०० व त्यापेक्षा अधिक पाळीवर आढळते.जेंव्हा पाऊस पडतो तेंव्हा नदी नाल्याचे पाणी मृत साठ्याच्या स्वरूपात जमिनीत साठले जाते.जे कि एकदा उपसले कि संपून जाते. आणि जोपर्यंत ओढे,ओघळ वहात असतात तोपर्यंतच विहीर व बोअरला पाणी असते.तर जिवंत साठ्याचे पाणी आज तरी भूगर्भातून संपलेले आहे. कारण जिवंत पाणी खोलवर जाण्यासाठी नैसर्गिक यंत्रणा हवी असते.एक पाण्याचा थेंब खडकातून पाझरून भूगर्भात जाण्याठी एक वर्षाचा कालावधी लागतो.म्हणजेच दहा फुटावर जाण्याठी दहा वर्ष लागतात.एक झाड एका दिवसाला ५० फुटावर दहा लिटर पाणी जमिनीत घेऊन जाते. कारण झाडं हे जमिनीच्या वर जेवढ्या उंचीपर्यंत असेल तेवढीच खोलवर त्याची मुळे असतात.म्हणून झाडं हे निसर्गाची बिनाखर्चाची पाईपलाईन आहे,

एक कडूनिंबाचे झाडं दहा हजार लिटर पाणी एकुण पावसाळ्यात जमिनीत घेऊन जाऊ शकते.याचा अर्थ आपल्या परिसरात किमान ३० झाडं निंब,चिंच,जांबळ,अंबा, मोह,अर्जुन या वर्गातील नक्कीच असतील.म्हणून मृत साठ्याचे पाणी पाझरत रहात असावे.एक वडाचे किंवा पिंपळाचे मोठे झाडं एका हंगामासाठी एक कोटी लिटर पाणी जमिनीत घेऊन जाते.आणि ते ही पन्नास फुटाच्या ही खाली. वडाची व पिंपळाचे मुळे पाषाणालाही भेदून ८०० ते १००० फुटावर पोचतात.एक कोटी लिटर म्हणजे एका विहीरीचा शंभर वेळा उपसा करावा एवढे पाणी. याचा गणितीय हिशोब सांगायचा झाला तर ३५ एकर शेतीचे रब्बी हंगामाचे भरणपोषण होते आणि वर्षभर बागायतीसाठी १५ एकरला पुरेल एवढे जिवंत साठ्याचे पाणी एक वड किंवा पिंपळ पुरवतो.म्हणून आपल्या शेताच्या शेजारी मोकळी पडीक जागा असेल तर किमान एक असा महावृक्ष लावा.आपण एक बोअरवेलसाठी एक लाख खर्च करतो. एका विहीरीसाठी पाच लाख खर्च करतो.पण पाण्याचा कुठलीच शाश्वती नाही'. कारण आपली नियत ही धुर्त असते, डोंगर संपुष्टात आणण्याची,डोंगारावरील झाडं तोडण्याची व वणव्यात जाळून संपवून बोडके करायची म्हणून पाणी तरी कुठून येणार? पाण्याचे दुर्भिक्ष हे मानव निर्मित आहे. देवाला किंवा निसर्गाला दोष देण्यात अर्थ नाही.खरे दोषी आपण मानव व आपला स्वार्थ आहे.

हवा ही ऊर्जा आहे.
पाणी हे अमृत आहे
तर माती ही जननी आहे.
तर झाडं हे जीवनदायी आहेत.

झाड नसेल तर हवा रोगट होते. पाणी विषासमान होते आणि माती वांझ होवून शापीत होते.म्हणूनच झाडांचं मूल्य समजून घ्या.आणि दहा रूपयाचं फक्त एक झाडं शेत असेल तर शेतात नाहीत तर माळरानावर, डोंगरावर कुठे ही जगविण्याची जबाबदारी म्हणून झाड लावा.या शिवाय दुसरा कुठलाच पर्याय शिल्लक नाही.तुम्ही गावाचे, शहराचे,देशाचे,समाजाचे आणि स्वहिताचे जर काही देणं लागत असाल तर एवढचं साध काम करा.

झाडं मानसाचं मन,मस्तिष्क व जीवन हिरवंगार करत असतात.हे एक सदैव लक्षात असु द्या.झाडांची पाणी पाठवण्याची व वाहण्याची क्षमता त्यांच्या वयावर व प्रकारावर अवलंबून असते.झाडाचे महत्व जाणाल तर तुमचं आस्तित्व वाढेल.मी गाव सोडून मुंबई शहरात आलो तरी गावाकडील वेगवेगळ्या ऋतुत हंगामात गावी जाऊन त्याचा उपभोग घेत असतो. म्हणजे मुंगाच्या चवलीच्या शेंगा खाण्यासाठी,किंवा हुरडा खाण्यासाठी,बोर खाण्यासाठी,आंबे,चिंचा खाण्यासाठी त्या त्यावेळी गावी गेलेच पाहिजे.मुंगफळीच्या शेंगा,तुरीच्या शेंगा खाण्यासाठी त्या त्या ऋतूमध्ये गेलेच पाहिजे आणि मुलांना सुद्धा गावाकडे नेले पाहिजे.अनेक मुलांना मुंगफळीच्या शेंगा कुठे येतात.तसेच तुरीच्या शेंगा कुठे लागतात हे शहरातील मुलांना माहिती नसते.म्हणूनच प्रत्येक ऋतुत मुलांना दोन दिवसासाठी गावी नेलेच पाहिजे.आपण स्वता निसर्गाने मोफत दिलेलं नष्ट करू नये,मुलांना त्यात भर घालण्यासाठी तयार केले पाहिजे. मी सेवा निवृत होण्या अगोदर माले मुळशी तालुक्यात सहली साठी गेलो होता. अनेक इंजिनियर अधिकारी सोबत होते. त्यांना घेऊन शेतावर गेलो. तिथे बटाटा पेरल होता ते हिरवागार शेत दाखवून सर्वांना विचारले हे कोणते पीक आहे. मुंबई शहरात राहणाऱ्या कोणालाच सांगता आले नाही. मग मी त्यांना सांगितले की हे बटाटे आहेत. मग स्थानिक ८४ वर्षाच्या शेतकऱ्यांची छोटीशी मुलाखत घेतली.त्याची छायाचित्र सोबत देत आहे.उन्हाळ्यात स्वतचे रक्षण करायचे असेल तर प्रत्येकानी झाडे लावली पाहिजे.आता पाऊसाळा सुरू होत आहे.म्हणूनच निसर्गाने मोफत दिलेलं नष्ट करू नका, त्यात भर घालून ते वाढवा.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९, भांडुप,मुंबई.**

# वडीलांचे दु:खद निधन ;वाढत्या तापमानाला आळा घालण्यासाठी घर परिसरात वडीलांच्या नावे वृक्षारोपण

## पिंपळगाव रेणुकाई येथील देशमुख कुटुंबीयाचा स्तुत्य उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**राम शिंदे । दानापूर**

परिसरात कौतुक भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव येथे यंदा सर्वत्र वारेमाप कधी नव्हे ऐवढे तापमान वाढले.याला कारणीभूत फक्त भुतलावरील कमी झालेल्या झांडाची संख्या आहे.त्यामुळे आपल्या वडीलांची अंत्यविधीची रक्षा नदीत,तलावात विसर्जित न करता तीच रक्षा घेत आपल्या वडीलांच्या नावाने मुलांनी आपल्या घर परिसरात अब्यांचे,चिकुचे व जांभळाचे झाड लावुन यापुढे देखील शेकडो झाडे लावुन पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न करणार असल्याचा पक्का निर्धार मनाशी बाळगला आहे.त्यामुळे या देशमुख कुटुंबाचे सर्वत्र कौतुक होत आहे.अनेकांच्या अंत्यविधीची रक्षा नदीत,तलावात विसर्जित करण्यात येते यामुळे नदीचे पावित्र्य शुद्ध राहत नसून नदीचे सौंदर्य देखील खराब होऊन मोठ्या प्रमाणावर जल प्रदूषण होते.शिवाय जल दूषित होते ही.ही भावना मनात ठेवत पर्यावरणाचा समतोल



अबाधीत ठेवण्यासाठी देशमुख कुटुंबायानी हा निर्णय घेतला आहे.दरम्यान या निमित्ताने आपण वडीलाच्या सहवासात राहुन त्यांची आठवण आपल्या कायम स्मरणार राहील असा देखील हेतु आपला असल्याचे या कुटुंबातील सदस्यांनी बोलावून दाखविले. भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथील जेष्ट नागरिक गणेशराव उत्तमराव देशमुख यांचे शनिवारी दुःखद निधन झाले.येथील देशमुख स्मशान भुमीत त्यांच्यावर अंतीम संस्कार करण्यात आला.सोमवारी सकाळी त्यांचा राखेच्या कार्यक्रम होता.यावेळी यावेळी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी ती रक्षा नदीत व तलावात न टाकता ती वडीलाच्या रुपाने आपल्याच घर परिसरात झाडे लावून पर्यावरणाचे धोक्यात आलेले अस्तित्व जोपसण्याचा निर्णय घेतला.यावेळी कुटुंबातील समाधान देशमुख,विठ्ठल देशमुख,लक्ष्मण देशमुख,विनोद देशमुख व ईतर सदस्यांच्या हस्ते घराच्या आवारात वडीलाच्या नावे पाच झाडे लावण्यात आले.शिवाय आणखी शेतात शेकडो लावण्याचा निश्चिय देखील यावेळी घेतला.यापुर्वी देखील अनेकांनी गावात याप्रकारे उपक्रम राबवुन ईतर गावासमोर एक वेगळा आदर्श घालुन दिला आहे.विशेष म्हणजे नदीत,किंवा इतर जल स्रोतात अंत्यविधीची रक्षा विसर्जित केल्यानंतर जलप्रदूषण होते शिवाय जलसाठ्यावर विपरीत परिणाम होतो हीच रक्षा जर झाडांना दिली तर वृक्षवाढसाठी मदत होते एकप्रकारे झाडांना टॉनिक प्राप्त होते त्यामुळे अंत्यसंस्काराची रक्षा नदीत न टाकता झाडांना देण्यात आल्याचे देशमुख कुटुंबातील सदस्यांनी बोलताना सांगितले आहे.

बाप म्हणजे जगातील अनमोल संपत्ती..बाप म्हणजे माणसाच्या आयुष्यातील सर्वात मोठी अनमोल संपत्ती आहे.बाप गेल्यावर माणुस हा पोरका होतो.त्यामुळे समाजातील प्रत्येकाने आहे तो पर्यंत आई वडीलांची निःस्वार्थ सेवा केली पाहीजे.वडीलांची आठवण कायम स्मरणात व डोळ्यासमोर रहावी म्हणून घराच्या आवारात त्यांच्या नावे झाडे लावली **–समाधान देशमुख**

**सद्या तर परिस्थिती अवघड होईल.ग्रामीण भागात दिवसेंदिवस भरदिवसा मोठमोठया झाडावर कुर्हाड चालवीली जात आहे.मात्र याकडे शासन आणि प्रशासन दुर्लक्ष करीत आहे.दरवर्षी पडणारा दुष्काळ व वाढते तापमान हे झाडांची कमी होत असलेली संख्या आहे.यंदा कधी नव्हे ऐवढा दुष्काळ या भागातील पडलेला आहे.त्यात तापमान ४२ ड्रीग्री सेल्ससीयसच्या समोर आहे.अशा गंभीर परिस्थितीत देखील वृक्ष तोड थांबता थांबत नसल्याचे चित्र ग्रामीण भागात आहे..**

# संगीन मज्जिद प्रकरणी वफ्फ बोर्डाच्या कार्यालया समोर घंटा नाद आंदोलन करणार–वर्षा जगदाळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

अंबाजोगाई येथील संगीन मज्जिद इनाम जमिनी बेकायदेशीररित्या खरेदी-विक्री करणाऱ्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने करण्यात आलेली आहे. बीड व छत्रपती संभाजी नगर तसेच मुंबई येथील वफ्फ कार्यालयात पुरावे सहित तक्रार करूनही अधिकारी लक्ष देत नसल्याने बीड येथील वफ्फ कार्यालयासमोर महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने अधिकाऱ्यांची झोप उघडविण्यासाठी घंटानाद आंदोलन करणार असल्याचे महाराष्ट्र निर्माण सेनेच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे.

अंबाजोगाई येथील वफ्फ संस्था मज्जिद संगीन



मौजे अंबाजोगाई यांची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र अनुक्रमांक एक पार्ट बी पान क्रमांक ६० व ६१ यामध्ये १९७४ पासून नोंद असून दर्गेचे सेवेसाठी एकूण१० सर्वे नंबर क्षेत्र २७६ एकर १८ गुंठे सेवेसाठी बहाल करण्यात आले होते. सदरील इनाम जमीन काही भूमाफियांनी संगणमत करत स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीर रित्या लाखो रुपयात खरेदी विक्री केलेली आहे. सदरील जमीन खरेदी विक्री प्रकरणी महाराष्ट्र निर्माण सेना मागील अनेक दिवसापासून पाठपुरावा करत आहे. या संदर्भात छत्रपती संभाजीनगर येथील वफ्फ कार्यालयात संबंधित खरेदी विक्रीचे सर्व कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहे .या गंभीर बाबीची दखल छत्रपती संभाजीनगर येथील वफ्फ अधिकारी घेत नसल्याने येत्या पंधरा दिवसात संबंधित प्रकरणात दोषी असणाऱ्या व्यक्ती विरोधात कायदेशीर कारवाई न झाल्यास महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने बीड येथील वफ्फ कार्यालया समोर महाराष्ट्र निर्माण सेना घंटानाद आंदोलन करणार असल्याचे निवेदनात महाराष्ट्र निर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे.

# शिक्षक नेते बबनराव पंडित यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बहुजन शिक्षक संघटनेचे विभागीय अध्यक्ष बबनराव पंडित यांना वाढदिवसा निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन परिसर बीड येथे वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा.याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते त्यामध्ये, बहुजन शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष विजयकुमार समुद्रे,आस संघटनेचे जिल्हाध्यक्ष करण राजपूत, उर्दू संघटनेचे शेख मणियार, महादेव विणकर, ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, मायकल वाघमारे, उद्योजक मनोज काळे, शिक्षक भरतीचे उद्योग खरात,मकरंद मराडे, पंचायत समितीचे वंजारे साहेब ,बर्डे पंढरी,आप्पा काळे.आदी शुभेच्छा देताना उपस्थित होते.

# माजी सैनिक अर्जुन वाघमारे यांचे निधन

## ॲड.रंजीत वाघमारे यांना पितृशोक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

सेवानिवृत्त मिलिट्री मॅन अर्जुन राजाराम वाघमारे वय ८२ यांचे



दिनांक ११ जुन २०२४ रोजी पुणे येथील खाजगी रुग्णालयात उपचारांना निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलं दोन मुली सुना नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. ते मनमिळ स्वभावाचे व धम्मकार्यात स्वतःला वाहून घेतले होते. सुप्ररिचित व्यक्तिमत्व होते. त्याच्या वर अंथरवन पिंपरी येथे अंत्यविधी शेतामधे करण्यात आला. यावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये वकील, डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, शिक्षक, विविध राजकीय पक्षाचे नेते, सामाजिक संघटनेचे नेते यांनी श्रद्धांजली वाहिली. त्यांचा अंत्यविधी त्यांच्या शेतामध्येच पार पाडण्यात आला. वाघमारे परिवाराच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

# विजयाच्या हॅट्रिकसह गडकरी तिसऱ्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात

## कारकीर्दीचा आलेख सातत्याने राहिला चढता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नागपूर । वृत्तसंस्था**

केंद्रीय मंत्रिमंडळाचा शपथविधी रविवारी सायंकाळी पार पडला आहे. यापूर्वी नागपूरमधून सलग दोन वेळा निवडून गेलेले आणि सलग दोनही वेळेत मंत्रिमंडळात स्थान पटकावलले तिसऱ्यांदा विजयी झाल्यावर नितीन गडकरी यांनी पुन्हा मंत्रिमंडळात मंत्री म्हणून शपथ घेतली. गडकरी यांच्या कुटुंबात पत्नी कांचन गडकरी, मुले निखिल व सारंग, विवाहित मुलगी केतकी कासखेडीकर यांचा समावेश आहे.गडकरींनी १९७६ मध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. नंतर वयाच्या २३ व्या वर्षी ते भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष झाले. २००५ मध्ये ते भाजपाचे प्रदेशाध्यक्षही होते. २००९-२०१३ पर्यंत ते भारतीय जनता पक्षाचे (भाजप) राष्ट्रीय अध्यक्ष होते. वयाच्या बावन्नव्या वर्षी ते भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष झाले आणि या पक्षाचे ते सर्वात तरुण अध्यक्ष होते. त्यांचा जन्म २७ मे १९५७ रोजी नागपूर येथे एका कृषक कुटुंबात झाला.

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर नागपूरकर गडकरी राष्ट्रीय राजकारणात सक्रिय झाले. २०१४ मध्ये त्यांनी प्रथम नागपूरमधून लोकसभा निवडणूक जिंकली व त्यात त्यांनी काँग्रेसचे दिग्गज नेते विलास मुत्तेम वार यांचा तब्बल २ लाख ८६ हजार मतांनी पराभव केला होता.पहिल्यांदाच लोकसभा गाठणाऱ्या गडकरी यांना मोदी यांनी मंत्रिमंडळातही स्थान दिले. २०१४ च्या पहिल्या केंद्रीय मंत्रीमंडळात ते रस्ते वाहतूक आणि महामार्ग, जहाजबांधणी, जलसंपदा, नदी विकास आणि गंगा पुनरुज्जीवन, ग्रामीण विकास आणि पंचायती राज मंत्री होते. तर २०१९ मध्ये त्यांच्याकडे रस्ते विकास खाते आहे. २०१९ च्या निवडणुकीत ते पुन्हा नागपूरमधून विजयी झाले. या निवडणुकीत त्यांचे मताधिक्य सत्तर हजाराहून अधिक मतांनी कमी झाले. मात्र मोदी-२ च्या मंत्रिमंडळातही गडकरी यांना



संधी मिळाली. पाच वर्षात त्यांनी पुन्हा रस्ते विकास व दळणवळण मंत्रालयात अनेक कामे केली.२०१४ ची निवडणूक गडकरींना तुलनेने कठीण गेली. पाच लाखांहून अधिक मतांनी आपण विजयी होऊ असा विश्वास गडकरी यांना होता. प्रत्यक्षात ते १ लाख ३७ हजार मतांनीच विजयी होऊ शकले. त्यामुळे त्यांनी विजयाचा जल्लोषही साजरा केला नाही.नागपूरमधून सलग तीन वेळा विजयी होऊन गडकरींनी केंद्रात मंत्रीपद पटकावले. गडकरी दोन दिवसांपासून दिल्लीतच मुक्कामी होते. एनडीएचे सरकार स्थापन होणार हे स्पष्ट झाल्यावर मंत्री कोण होणार याची चर्चा सुरू झाली होती. महाराष्ट्रातील संभाव्य मंत्र्यांच्या यादीत गडकरी यांचे नाव पहिल्या क्रमांकावर होते. लोकसभा निवडणुकीत भाजपा उमेदवारांच्या पहिल्याच यादीत अपेक्षित असतानाही नितीन गडकरींचे नाव नव्हते. त्यामुळे याही वेळी मंत्रीमंडळात पहिल्यांदाच त्यांचे नाव येते की विस्तारात समावेश होतो अशी शंका कार्यकर्त्यांना होती. मात्र, गडकरी यांना मंत्रीपदाची शपथ घेण्याबाबत पीएमओमधून दूरध्वनी आल्या नंतर हा संभ्रम दूर झाला.


# अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी सीईओ निता अंधारे विरोधात तक्रारीची सहा. आयुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई कडुन दखल-डॉ.ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी कारवाई न करता स्ट्रक्चरल ऑडिटच्या नावाखाली होर्डिंग्जला वैध ठरवत अनेक वर्षांपासून पालिकेचा कर बुडवणा-या होर्डिंग्ज धारकांची पाठराखण करत उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांच्या आदेशाची अवमानना करणा-या मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केल्यानंतर त्याची दखल घेऊन सुवर्णा ओगले -शिंदे सहा.आयुक्त(गट -अ) नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांनी सह आयुक्त, उपायुक्त नगर परिषद प्रशासन शाखा विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना सदर प्रकरणाची आपल्या स्तरावरून शहानिशा करून उचित कार्यवाही करण्यात यावी.तसेच केलेल्या कार्यवाहीची एक प्रत संचलनयास तात्काळ सादर करण्यात यावी असे नमुद केले आहे.

मुंबईच्या घाटकोपर येथील होर्डिंग्जच्या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाल्यानंतर उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचनालय मुंबई यांनी बीड नगरपरीषदेला शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज हटविण्याचे आदेश दिले होते.तसेच २४ तासात न हटवल्यास फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते.परंतु सीईओ नगर परिषद बीड निता अंधारेंकडुन बीड शहरातील



९० अनाधिकृत होर्डिंग्ज त्यापैकी १९ होर्डिंग्ज सार्वजनिक ठिकाणी आणि ७१ होर्डिंग्ज घर,ईमारतीवर लावण्यात आल्याचे आढळून आले असुन यापैकी एकाही होर्डिंग्जला नगरषरीषदेची परवानगी नाही. त्यामुळे आजपर्यंत शासनाचा लाखो रूपयांचा कर बुडाला आहे.मात्र संबंधित प्रकरणात कारवाई करण्याऐवजी कर अधीक्षक बीड नगर पालिका विश्वंभर तिडके हे सीईओ नीता अंधारे यांच्या सांगण्यावरून स्ट्रक्चरल ऑडिट करून त्यांना अधिकृत करण्याचा घाट घातला आहे.जवळपास १० वर्षापेक्षाही आधिक काळ बीड शहरातील सोनाजी रमेश, निळकंठ कुलकर्णी (प्रथमेश डिजिटल),शेख हबीब (ट्रीम्स क्रिएशन्स),राम सवासे (निर्मिती ग्राफिक्स),शुभम कोतवाल (एस.के.एडव्हायझर्स) या ५ लोकांच्या अनाधिकृत होर्डिंग्जची पाठराखण करताना दिसत आहे. यापाठिमागे मोठ्या प्रमाणावर आर्थिक साटेलोटे असल्याचे बोलले जात आहे.

# इंजिनिअर साहेब! अगोदर अर्धवट राहिलेले धोकादायक पुलाचे काम पूर्ण करण्याचे सोडून पुलाखाली भराव टाकता कशाला?-ग्रामस्थांचा सवाल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कडा । राजू म्हस्के**

तालुक्यातील साबलखेड ते आष्टी असा १७ किलोमीटर राष्टीय महामार्गाचे गेल्या दीड वर्षांपासून कॉंक्रीटीकरणाचे काम अतिशय कासवगतीने चालू असून ठिकाणी ठिकाणी लहान मोठे नाल्यावरील नदीवरील पुलाचे सुध्दा नव्याने काम सुरू आहे कडा,शेरी बु , खाकळवडी, जळगाव, कासारी येथे मोठमोठ्या नदीवरील पुलाचे काम नव्याने करण्यात येत आहे तसेच कडा येथे अमोलक जैन विद्यालय , पेट्रोल पंप , शेरी बु येथे - २, वटनवाडी-३,कासारी येथे असे लहान लहान ओढ्यावर पुलाचे काम चालू असून ते पावसाळ्याच्या अगोदर पूर्ण करणे गरजेचे होते तसे आश्वासन राष्ट्रीय महामार्गाचे संबंधित अधिकारी यांनी दिले होते परंतु त्याचे आश्वासन पाऊसाबरोबर वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही मागील वर्षी अचानक आलेल्या ढगफुटी पावसाने प्रशासनाला अनुभव असताना वास्तविक पाहता पावसाळ्यात तालुक्यातील सर्वात अगोदर शेरी बु येथील नदीला या नदीला भरपूर प्रमाणात पाणी दुथडी पाणी वाहून जात असते, त्याठिकाणी ठेकेदार अन अधिकारी यांनी भराव टाकून नळीद्वारे पाणी काढून देण्याचा घाट घातला आहे परंतु त्यातून खरोखरच आलेला पूर वाहुन जाईल का ? याचा कोणत्याही प्रकारची पडताळणी न करता पुलाच्या बाजूने भराव टाकून पर्यायी रस्ता करण्यात येत आहे परंतु ते अतिशय धोकादायक ठरू शकते, विशेषतः नदीच्या काठावर महादेव मंदिर व जिल्हा परिषद शाळा असून लहान लहान मुलं तिथं ज्ञानार्जन करीत आहेत मोठा अनर्थ होऊ शकतो म्हणून राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी यांनी यात लक्ष घालून ते काम थांबून पावसाळा संपल्यावर करण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे तसेच कडा येथील कडी नदीवरील पुलाचे काम पूर्ण करून वाहतूक सुरळीत करावी. कारण मध्यंतरी अवकाळी पावसाने शेरी येथील एक छोटासा



ओढ्यामुळे रस्ता वाहून गेल्याचे बातम्या आल्या होत्या सुदैवाने पोलीस प्रशासनाचे अधिकारी संतोष खेतमाळस यांच्या प्रसंगावधानाने कोणत्याही प्रकारची जीवितहानी व वित्तहानी झाली नव्हती एका छोट्याशा ओढ्याने प्रशासनाचे हाल झाले होते तर मोठ्या मोठ्या नदीवरील पूल पाडून ते अर्धवट करून फायदा काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे , म्हणून ठेकेदारांनी अगोदर अर्धवट केलेले कडा नदीवरील पुलाचे काम पूर्ण करावे तसेच या राष्ट्रीय महामार्गावरील अतिशय धोकादायक ठरू शकतील असे छोटे छोट्या ओढ्यावर बांधलेले अर्धवट पुलाचे काम पूर्ण करावे अशी मागणी शिवसंग्राम चे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी केली आहे.

### क्या हुआ तेरा वादा

१५ जून तारीख काही दिवसावर आली असून परंतु कडा येथील कडी नदीवरील पुलाचे काम १५ जून पर्यंत पूर्ण करून वाहतुकीसाठी खुला करून देऊ असे आश्वासन देणारे इंजि.भोपळे साहेब यांना नागरीक विचारतात क्या हुआ तेरा वादा !!

**इंजि.भोपळे साहेब यांच्याशी संपर्क साधला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही त्यामुळे त्यांची बाजु समजु शकली नाही.**

# आश्चर्यम ट्रान्सफॉर्मर जळाला आणि दोन तासातच नविन ट्रान्सफॉर्मर मिळाला ;उप अभियंता विजय हुलकुडे यांची कार्यतत्परता-डॉ.ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

लिंबागणेश ग्रामीण किंवा शहरी भागातील रोहित्र नादुरुस्त किंवा जळाल्यापासुन ३ दिवसात दुरुस्ती करून मिळेल असे ऊर्जामंत्र्यांचे आदेश असुन त्यासाठी महावितरण कडून हेल्पलाईन सुरू केलेली असताना त्याचा फारसा समाधानकारक अनुभव नसताना आज मात्र लिंबागणेश येथील बसस्थानक येथील ट्रान्सफॉर्मर तपासाअंती जळाल्याचे स्थानिक महावितरण कर्मचाऱ्यांना कळाल्यानंतर डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी, पांडुरंग वाणी, बशीर शेख,अभय वनवे, कैलास गायकवाड यांनी उप अभियंता महावितरण कार्यालय लिंबागणेश विजय हुलकुडे यांच्याशी संपर्क साल्यानंतर फक्त २



तासातच नविन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून देण्यात आला याबद्दल ग्रामस्थांनी हुलकुडे यांचे अभिनंदन केले.रात्री नविन रोहित्र बसविण्यासाठी कर्मचारी वैष्णव वैष्णव सुरवसे, युवराज सुरवसे आणि अंकुश गायकवाड यांचे कर्मचारी तुकाराम गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी मदत केली.ग्रामीण भागातील रोहित्र नादुरुस्त किंवा जळाल्यापासुन अनेक दिवस ग्रामस्थांना अंधारात रहावे लागते.हा प्रकार थांबविण्यासाठी महावितरणकडुन हेल्पलाईन क्रमांक ७८७५७६२००७ प्रसारित करण्यात आली आहे.ग्रामस्थांनी महावितरणच्या हेल्पलाईनला नादुरुस्त रोहित्राची माहिती स्थानिक मंडळ स्तरावरील कार्यकारी अभियंता व विभागाला द्यायची आहे. तसेच रोहित्राची माहिती देण्याबरोबरच व्हाट्सअप नंबरवर जळालेल्या ट्रान्सफॉर्मरचे फोटो आणि ठिकाणाचा तपशील पाठवायचा आहे.त्यानंतर ३ दिवसाच्या आत महावितरण कडून पर्यायी रोहित्र उपलब्ध करून देण्यात येईल असे विभागाकडून सांगण्यात येते. माहिती मिळाल्यानंतर ३ दिवसांच्या आत रोहित्राचे आईल उपलब्ध करणे,दुरूस्त रोहित्र उपलब्ध करणे,ईतर कामे करून या कालावधीत रोहित्र मिळेल अशी माहिती वितरणकडुन सांगण्यात येते. ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर अथवा बिघडल्यास तेथे लवकर दुरूस्त ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी ऊर्जामंत्र्यांनी महावितरणला निर्देश दिले आहेत.दिलेल्या निर्देशानुसार महावितरणने राज्यभर मोहीम सुरू केली आहे.कुठेही माहितीच्या अभावी गाव किंवा शहराचा परीसर अंधारात राहु नये यासाठी महावितरणकडून प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जाते.

# पोलिसबळाचा वापर केला तर जशास तसे उत्तर देणार-राजू शेट्टी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर (वृत्तसंस्था)**

रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गाच्या कोल्हापूर जिल्ह्यातील चोकाक ते अंकली या महामार्गाच्या मोजणीबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून काम सुरु आहे. महामार्गासाठी संपादित होणाऱ्या जमिनीस चौपटीप्रमाणे मोबदला न देता पोलिसबळाचा वापर करून जबरदस्तीने मोजणी केल्यास जशास तसे उत्तर देवू, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी दिला. रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गाच्या कोल्हापूर जिल्ह्यातील चोकाक ते उदगांव-अंकली या महामार्गाच्या मोजणीबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचेकडून कार्यवाही करण्यात येत आहे. जुन्या बायपास महामार्गावरून महामार्ग व चौपट भरपाई अशी शेतकर्यांची मागणी असताना वारंवार प्राधिकरण मोजणीसाठी येत आहे. सोमवारी उदगांव येथे मोजणीसाठी येताना प्राधिकरणाच्या अधिकार्यांनी पोलिसांची कुमक बोलावून घेतली होती. त्यामुळे पोलिसबळाचा वापर केला तर जशास तसे उत्तर देऊ असा इशारा स्वाभिमानीचे नेते राजू शेट्टी यांनी दिला आहे.राजू शेट्टी म्हणाले की, जमिनी मोजण्यासाठी येण्यापूर्वी शेतकर्यांना आठ दिवस अगोदर नोटिसा देणे आवश्यक असते. मात्र उदगांवच्या शेतकर्यांना शनिवारी व रविवारी नोटिसा देऊन सोमवारी मोजणीसाठी पथक येत आहे. त्यामुळे या भागातील शेतकर्यांचा तीव्रपणे विरोध असून उदगांव येथील सध्या असलेल्या बायपास महामार्गावरूनच होणारा महामार्ग झाला पाहिजे. शिवाय बाधीत शेतकर्यांना बाजारभावाच्या चौपट दर मिळाला पाहिजे. असे असताना याकडे प्राधिकरण विभागाने किंवा शासनाने दुर्लक्ष केले आहे. जमिनी या शेतकर्यांच्या आहेत. त्यामुळे मोजणीसाठी येताना जर पोलिस बंदोबस्त घेऊन येत असाल तर शेतकरी तुम्हाला तुमची जागा दाखवतील.

# पक्ष चालवण्यासाठी विनोद तावडे यांची भूमिका मोठी-चंद्रकांत पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे(वृत्तसंस्था)**

वनोद तावडे यांनी पक्षाच्या सरचिटणीसपदी अत्यंत चांगले काम केले आहे. त्यामुळे लवकरच त्यांना मोठी संधी दिली जाऊ शकते, असे सूचक विधान भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी केले आहे. तर पक्ष चालवण्यासाठी तावडे यांची भूमिका मोठी आहे, असेही चंद्रकांत पाटील म्हणाले.दरम्यान निवडणुकीत बसलेल्या या फटक्यामुळे आता भाजपचे बैठकीचे सत्र सुरू झाले आहे. सध्या वरिष्ठ पातळीवर नेत्यांच्या बैठका सुरू असून अनेक राज्यांमधील नेतृत्वात मोठे बदल केले जाऊ शकतात, अशी शक्यता वर्तवली जाते आहे. अशातच चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या विधानाने महाराष्ट्र भाजपमध्ये काही बदल होणार का? अशा चर्चा सुरू झाल्या आहेत.चंद्रकांत पाटील म्हणाले की, युती तोडून उद्धव ठाकरेंनी काय मिळवले १८ जागांवरून त्यांच्या ९ जागा आल्या. याशिवाय अल्पसंख्याकांच्या जीवावर निवडून आले हा ठपका त्यांच्यावर आहे. विनोद तावडे हे पक्षाच्या सरचिटणीस पदापासून काम करत आहेत. त्यांच्यावर जी जबाबदारी आजपर्यंत दिली ती त्यांनी यशस्वीपणे पूर्ण केली आहे. त्यामुळे त्यांना पक्षात आता मोठी संधी दिली जाऊ शकते.भाजप राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी मनोहरलाल खट्टर, शिवराजसिंह चौहान, भूपेंद्र यादव, धर्मेंद्र प्रदान, सीआर पाटील यांची नावे चर्चेत होती. पण या सर्वांनाच केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळाले. त्यामुळे ही सर्व नावे मागे पडली असून भाजप नव्या नेत्यांच्या शोधात आहे.

# दिव्यांगाच्या न्यायासाठी सर्वतोपरी लढू-रिपब्लिकन सेना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यदरहीम रजा**

दिव्यांग व्यक्तीचा गौण खजिन वाहतुकीकरीताचा वापरण्यात येणारा टिप्पर वनपरिक्षेत्र अधिकारी उमरखेड यांनी ३ फेब्रुवारी रोजी मेट शिवारात १८ ते २० लाख रुपये किमतीचे वाहन कुठलीही चौकशी व दस्ताऐवजाचा पंचनामा न करता सदर वाहनाची रॉयल्टी परवाना असतानाही वाहन जप्त करून नागापूर वनडेपो मध्ये लावण्यात आले. ढाणकी येथील वाहन मालक शंकर पिराजी हरकरे यांनी गयावया केली मात्र तडजोडी नकार दिल्याने व काही दिवसांनी गाडी सोडविण्यासाठी एक लाख रुपयाची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद



आहे. दंड भरण्याकरिता जेव्हा हरकरे हे आर. एफ. ओ. कडे गेले असता, त्यावेळी वनाधिकारी यांच्याकडून सदर वाहन चोरी गेल्याची माहिती हरकरे यांना देण्यात आली. आज रोजी दोन महिन्याचा कालावधी उलटून सुद्धा आणि उपोषणकर्ते हे आठ दिवसापासून यवतमाळ येथील वनसंरक्षक यांच्या दालनासमोर उपोषण करीत असताना वनविभागाच्या कुठल्याही वरिष्ठ अधिकाऱ्याकडून साधी दखल घेण्यात आली नाही, त्या अनुषंगाने सामाजिक बांधिलकी जपत रिपब्लिकन सेनेचे शिष्टमंडळ हे उपोषण मंडपाला भेट देऊन वनविभागाचा जाहीर निषेध नोंदवून जोपर्यंत सदर प्रकरणातील दोषी अधिकारी तथा कर्मचारी यांच्यावर जोपर्यंत कठोर कारवाई होणार नाही तोपर्यंत रिपब्लिकन सेनेच्या वतीने ठिकठिकाणी आंदोलन, मोर्चे काढण्यात येतील व पीडितांना न्याय मिळवून देण्यात येईल अशी ग्वाही यावेळी देण्यात आली.

यावेळी रिपब्लिकन युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनिल पाटील चिंचोलकर, शहराध्यक्ष शुद्धोधन दिवेकर, तालुका अध्यक्ष गौतम नगरे, तालुका उपाध्यक्ष भीमराव खंदारे, तालुका सरचिटणीस साहेबराव कदम, साई पाटील, नंदू इटकरे व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिक्षण महर्षी बापूसाहेब राठोड यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने मोठ्या उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

गुणाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टी ग्रामीणचे लातुर जिल्हा सरचिटणीस बापूसाहेब राठोड यांचा वाढदिवस दिनांक ११ जून २०२४ रोजी जीएसपीएम कॅम्पस ,उदगीर येथे विविध उपक्रमाने मोठ्या उत्साहात संस्थेचे सचिव अमित राठोड, सहसचिव विजय राठोड, कोषाध्यक्ष दिगांबर राठोड, सदस्य रोहित राठोड यांच्या उपस्थिती मध्ये साजरा करण्यात आला. प्रतिवर्षी बापूसाहेब राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त जी.एस.पी.एम संस्थेतील राजीव गांधी तंत्रनिकेतन उदगीर, एस आर इन्स्टिट्यूट ऑफ डिप्लोमा इन फार्मसी उदगीर,राजीव गांधी औद्योगिक प्रशिक्षण संस्था उदगीर, बिर्ला ओपन माईंड्स इंटरनॅशनल स्कूल उदगीर व शंकर माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा उदगीर यांच्या संयुक्त वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते




यावर्षीही वृक्षारोपन, भव्य रक्तदान शिबीर याचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबीरास संस्थेतील कर्मचारी व विदयार्थ्यी यांनी मोठया संख्येने सहभागी होऊन रक्तदान केले. यावेळी वरील सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

तसेच बापूसाहेब राठोड यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, भाजपा प्रदेश सचिव देविदास राठोड,भाजपा अ.जा.मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष बालाजी गवारे, रामेश्वर बद्दर, माजी नगरसेवक शहाजी पाटील तळेगावकर, माजी नगरसेवक समिर शेख, कुणाल बागबंदे, माजी नगरसेवक गणेश गायकवाड, रामदास बेंबडे, उदयसिंह ठाकूर, अँड .सागर बिरादार, संजय पाटील मलकापूरकर, उत्तम कारभारी तसेच निडेबन जिल्हा परिषद गटातील सर्व गावचे सरपंच व निडेबनचे ग्रा.प.सदस्य रणजीत पाटील, चांदेगावचे सरपंच पंकज मुसने,जानापूरचे सरपंच कल्याण बिरादार,लिंबगावचे सरपंच प्रशांत चामे, विनायक सूर्यवंशी, धडकनाळचे सरपंच बालाजी परकड, चोंडीचे सरपंच पाटील, शिरोळचे सरपंच केशव सगर, मदन पाटील, रामदास काळगापुरे , तोंडचीर येथील प्रदीप जाधव,अंकुश ताटपल्ले, कुमदाळचे सरपंच रामदास ऐनिले, मादलापूरचे ग्रामपंचायत सदस्य बालाजी बनसोडे,राजेश्वर पाटील,सुनील जाधव, बामणी येथील संतोष कारभारी,मल्लापूर येथील भगवान आडे, बाबुराव राठोड, शिवाजी राठोड, कृष्णा आडे, मंचा तांडा येथील श्याम राठोड गुरूजी, देवर्जन येथील संतोष रोडगे, गायमाळ तांडा येथील तानाजी राठोड, सामाजिक कार्यकर्ते सतिश पाटील, बाबासाहेब सूर्यवंशी, राजकुमार सोमवंशी, मारोती पाटील यांच्यासह अनेक गावचे ग्राम पंचायत सदस्य, ग्रामसेवक, विविध वर्तपत्राचे पत्रकार , सामाजिक कार्यकर्ते , डॉक्टर्स,प्रतिष्ठित व्यक्ती,शैक्षणिक संस्थांचे संस्थाचालक, राजकीय नेते यांनी प्रत्यक्ष भेटून,फोनव्दारे व विविध माध्यमांचा साह्याने वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या .

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904